महा मेट्रो

PUNE METRO

## मेट्रो प्रकल्पाचे काम वेगाने सुरू - डॉ. ब्रिजेश दीक्षित

### · प्रकल्पाचे काम सुरू झाल्याचा पहिला वर्धापनदिन पार

### · यानिमित्त अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन

पुणे, २३ जानेवारी २०१८: "मागील वर्षी २३, जानेवारी २०१७ रोजी महामेट्रोच्या वतीने पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात उभारण्यात येणा-या पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली होती. गेल्या वर्षभरात या प्रकल्पाच्या कामाची प्रगती ही समाधानकारक असून, येत्या काही महिन्यात या प्रकल्पाचा वेग आणखी वाढेल असे प्रतिपादन महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी केले. मेट्रो प्रकल्पाच्या कामांना सुरू होऊन एक वर्ष झाल्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. दीक्षित बोलत होते. महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम, तांत्रिक सल्लागार शशिकांत लिमये आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. दीक्षित म्हणाले की, पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात होत असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामात रिच १ अर्थात पीसीएमसी ते रेंज हिल्स (१०.७९५ किमी) या मार्गिकेचा समावेश आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात या मार्गीके दरम्यान मेट्रो प्रकल्पाच्या व्हाया ड्क्ट भागाचे काम सुरू असून या संदर्भातील निविदा हा एनसीसी लिमिटेड या कंपनीला देण्यात आला आहे. सदर मार्गिके दरम्यान पीसीएमसी ते हॅरिस पुला दरम्यान मेट्रो प्रकल्पाचे काम हे वेगाने सुरू आहे. रिच १ मधील खराळवाडी येथे ग्राउंड लॉचिंग सिस्टीमच्या आधारे पियर क्रमांक ३४९ आणि पियर क्रमांक ३४८ मधील सेगमेंट नुकताच उभारण्यात आला आहे. सदर स्पॅनची लांबी ही २८ मी असून यामध्ये २ मी लांबीच्या २ स्पॅन व ३ मी लांबीच्या स्टॅण्डर्ड सेगमेंटच्या ८ स्पॅनचा समावेश आहे. याबरोबरच आज पर्यंत पीसीएमसी ते रेंज हिल्स मार्गिकेदरम्यान ७५ फुटिंग्स, ३२ पियर्स, १० पिअर कॅप आणि १०२ कास्टेड सेगमेंट तयार झाले आहेत अशीही माहिती डॉ. दीक्षित त्यांनी यावेळी दिली.

डॉ. दीक्षित ते पुढे म्हणाले की, मेट्रो प्रकल्पाच्या उन्नत स्थानकांचे काम हे अल फारा’ ए (जेव्ही) या कंपनीला देण्यात आले असून रिच १ या मार्गिके दरम्यान ९ उन्नत स्थानके असणार आहेत. या

प्रत्येक स्थानकाची लांबी ही १४० मी आणि रुंदी २१ मी इतकी असेल. याबरोबरच प्रत्येक स्थानकाला आत येण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी ४ मार्ग असतील. याशिवाय प्रत्येक स्थानकांमध्ये सरकते जिने (एस्कलेटर) आणि उद्वाहक (लिफ्ट) यांचीही सोय असणार आहे. आज पर्यंत संत तुकारामनगर ,कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी आणि बोपोडी या ठिकाणी मेट्रो प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली असून संत तुकारामनगर ,कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी या स्थानकांच्या येथे जिओ टेक्निकल सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे. याबरोबरच भूमिगत माहिती मिळविण्यासाठी आवश्यक असलेले ग्राउंड पेनिट्रेशन रडारचे (जीपीआर) ४ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून या चार ठिकाणी अधिक माहिती मिळविण्यासाठी मॅन्यूअल ट्रेन्चिंग वर्कचे काम सुरू आहे. याबरोबरच संत तुकाराम नगर येथील मेट्रो स्थानकाचे काम हे देखील वेगाने सुरू असून कास्टिंग यार्ड येथे प्री स्ट्रेस गिर्डर्स आणि आरसीसी गिर्डर्स यांचे काम देखील सुरू आहे.

महामेट्रो तर्फे प्रथम वर्धापन दिनानिमित्त नुकतेच पाच दिवस अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये पहिल्या दिवशी स्वछता मोहीम, दुसऱ्या दिवशी पुणे महानगर व पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सरकारी शाळांमध्ये चित्रकला आणि निंबध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पुण्यातील नावाजलेल्या ‘वसंतोत्सव’ या तीन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये देखील महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना सन्मानित करण्यात आले होते. तसेच महामेट्रोच्या घोले रस्त्यावरील कार्यालयातील कर्मचा-यांसाठी हर्षल जावळे यांच्या आध्यात्मिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होते.

याबरोबरच महामेट्रो तर्फे पुण्यात एका परिसंवादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे .शिवाजीनगर येथील बालगंधर्व रंगमंदिर या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये रश्मी शुक्ला (पोलीस आयुक्त, पुणे), कुणाल कुमार (आयुक्त, पुणे मनपा), श्रावण हर्डीकर(आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा) , नितीन देसाई (सुप्रसिद्ध नैपथ्य व कला दिग्दर्शक), डॉ . के .एच. संचेती (पुण्यभूषण पुरस्कारार्थी ), डॉ. स्वाती मुजुमदार (प्राचार्य - संचालिका, सिंबायोसिस एज्युकेशन ट्रस्ट), महेश नामपूरकर (प्रसिद्ध लँडस्केप डिझायनर) आदी मान्यवर सहभागी होतील. यावेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित, तांत्रिक सल्लागार शशिकांत लिमये आणि कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम हे देखील उपस्थित असतील.

पुणे मेट्रो प्रकल्पाच्या कामाची सुरुवात होऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. या वर्धापन दिनानिमित्त पिंपरी चिंचवड परिसरातील हिंदुस्थान एँटिबायोटिक्स येथील शाळा, खराळवाडी माध्यमिक विद्यालय या ठिकाणी व पुणे शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस या शाळेमध्ये चित्रकला आणि निंबध स्पर्धांचे आयोजन मेट्रोच्या वतीने करण्यात आले होते. सदर स्पर्धेच्या विजेत्यांनाही यावेळी पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी विजेत्यांना बक्षिस म्हणून सायकल देण्यात आली.

फेसबुक , ट्विटर प्रत्येकी पाच फॉलोवर्स आणि दोन व्हिसाल ब्लोवर यांना सुद्धा पारितोषिक देण्यात येत आहे . त्यामध्ये अभिषेक रासकर , ऋतुल थोरात , श्रीप्रसन्न बावडेकर , महेंद्र सामंत , पॅबित्रा मोहन स्वाईन यांना फेसबुक फॉलोवर्स म्हणून गौरवण्यात येणार आहे. तसेच ट्विटर मधील शैल माळवदकर , वैभव कुलकर्णी , चैतन्य अडगावकर , शिरीष ,आकाश टेटगुरु यांना पहिले पाच ट्विटरफॉलोवर्स म्हणून गौरवण्यात येणार आहे . तसेच बेस्ट विसल ब्लोवर म्हणून चंदू गोसावी आणि अभय जगदाळे यांना देखील गौरविण्यात येणार आहे .

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महामेट्रो तर्फे घोषवाक्य स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा निकाल देखील या वेळी जाहीर करण्यात आला. यामध्ये पुणे केंद्रातून चेतन शेगावकर यांनी प्रथम क्रमांक, दत्तात्रय टेमघरे यांनी द्वितीय तर संदीप औताडे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. तर निखिल शेजवळ, अद्वैत सोवळे, सुवर्णा भलायकार, विजय कडू आणि ऋत्विक जोशी यांनी उत्तेजनार्थ बक्षिस पटकाविले.